## MAHARASHTRA ACT No. XXVI OF 1978.

## THE MAHARASHTRA MUNICIPALITIES (POSTPONEMENT OF ELECTIONS DUE TO ENSUING GENERAL ELECTIONS TO MUNICIPAL COUNCILS) ACT, 1978.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १९ डिसेंबर १९७८ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एम. ए. घोले,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXVI OF 1978.

## AN ACT TO PROVIDE FOR THE POSTPONEMENT OF ELECTIONS TO CERTAIN MUNICIPAL COUNCILS AND OF CERTAIN PRESIDENTS AND COUNCILLORS FOR A SHORT PERIOD ON ACCOUNT OF ENSUING GENERAL ELECTIONS TO THE MAJORITY OF THE MUNICIPAL COUNCILS IN THE STATE.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर, **महाराष्ट्र शासन राजपत्रात**, दिनांक २६ डिसेंबर १९७८ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.

**राज्यातील बहुसंख्य नगरपालिकांच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे थोड्या कालावधीसाठी विवक्षित नगरपालिकांच्या व विवक्षित अध्यक्षांच्या व पालिका सदस्यांच्या निवडणुका लांबणीवर टाकण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

१९७३ चा महा- राष्ट्र ४७.

**ज्याअर्थी,** मतदारांनी नगरपालिकांच्या अध्यक्षांची प्रत्यक्ष निवडणूक करण्याची पद्धती महाराष्ट्र नगरपालिका (निवडणूक विधीमध्ये आणि इतर उपबंधांमध्ये सुधारणा करणे व निवडणुका आणखी पुढे ढकलणे) अधिनियम, १९७३ याद्वारे सुरू करण्यात आली ;

**आणि ज्याअर्थी,** नगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका आणि प्रत्यक्ष निवडणूक पद्धतीने अध्यक्षांच्या निवडणुका नोव्हेंबर १९७४ मध्ये घेण्यात आल्या होत्या ;

**आणि, ज्याअर्थी,** त्यानंतर काही नगरपालिका विसर्जित करण्यात आल्या आहेत, अध्यक्षांची काही पदे रिकामी झाली आहेत आणि पालिका सदस्यांची काही नैमित्तिक पदे रिक्त झाली आहेत व या पालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका किंवा अध्यक्षांची किंवा पालिका सदस्यांची रिक्त पदे भरण्यासाठी निवडणुका नोव्हेंबर-डिसेंबर १९७८ मध्ये घेणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** नवीन नगरपालिकांच्या सदस्यांना (नवीन अध्यक्षांसह), जोपर्यंत विसर्जित पालिकांच्या सदस्यांनी पद धारण केले असते तोपर्यंतच म्हणजे डिसेंबर १९७९ पर्यंतच पद धारण करण्याचा हक्क आहे ;

**आणि ज्याअर्थी,** एवढ्या कमी कालावधीकरिता निवडणुका घेऊ नयेत, कारण जवळ जवळ एकच वर्षाच्या कालांतराने पुन्हा या निवडणुका होणे उमेदवारांना तसेच सर्वसाधारण मतदारांना गैरसोयीचे होईल अशी अभिवेदने शासनाकडे आलेली होती ;

**आणि ज्याअर्थी,** एका वर्षाच्या अल्प मुदतीत नगरपालिकांनी निवडणुकांवर दोनदा खर्च करणे हा सार्वजनिक पैशाचा अपव्यय असून, हाच पैसा नगरपालिका क्षेत्रांच्या रहिवाश्यांना आणखी काही सुखसोयी पुरवण्यासाठी वापरणे शक्य आहे असे वाटले होते ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाने मतदारांनी अध्यक्षांची प्रत्यक्ष निवडणूक करण्याच्या पद्धतीचे पुनर्विलोकन करण्यासाठी एका समितीची नेमणूक केली होती आणि समितीने केलेल्या शिफारशीवर विचार केल्यानंतर उक्त पद्धती बंद करण्यासाठी विधानसभेमध्ये १९७७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ मांडले होते व उक्त विधेयकाची मुदत समाप्त झाली आहे आणि हे विधेयक पुन्हा मांडावे किंवा नाही याचा निर्णय शासनाने अद्याप घेतलेला नाही ;

**आणि ज्याअर्थी,** या व यानंतर दिलेल्या इतर कारणांसाठी नगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका व पोट-निवडणुका (अध्यक्षांच्या निवडणुकांसह) लांबणीवर टाकणे इष्ट होते ;

**आणि ज्याअर्थी,** निवडणुका अशा प्रकारे लांबणीवर टाकल्यामुळे संबंधित प्रशासकांचा पदावधी वाढवणे आवश्यक होते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्याच्या विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** पूर्वोक्त बाबी व त्याशी संबंधित बाबी यांची तरतूद करण्यासाठी, कायदा करण्यासाठी तात्काळ कृती करणे त्यांना आवश्यक ठरते अशी परिस्थिती असल्याबद्दल महाराष्ट्राचे राज्यपाल यांची खात्री झाली होती, आणि म्हणून त्यांनी १३ नोव्हेंबर १९७८ रोजी महाराष्ट्र नगरपालिका (नगरपालिकांच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे निवडणूक लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९७८ हा प्रख्यापित केला होता ; १९७८ चा महाराष्ट्र अध्यादेश ९.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** आता भारतीय गणराज्याच्या एकोणतिसाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, प्रारंभ व मुदत. १. (१) या अधिनियमास महाराष्ट्र नगरपालिका (नगरपालिकांच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७८ असे म्हणता येईल.

(२) तो १३ नोव्हेंबर १९७८ रोजी अंमलात आल्याचे मानण्यात येईल.

(३) तो ३१ डिसेंबर १९७९ हा दिवस धरून त्या दिवसापर्यंत किंवा राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अधिसूचित करील अशा त्यापूर्वीच्या तारखेपर्यंत अंमलात राहील व त्यानंतर तो रद्द होईल. हा अधिनियम समाप्त झाल्यानंतर, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ हे जणू काही तो अधिनियम महाराष्ट्र अधिनियमाद्वारे रद्द झाला आहे असे समजून लागू होईल. १९०४ चा मुंबई १.

१२८

२. या अधिनियमात, संदर्भावरून दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— व्याख्या.

(अ) "प्रशासक" म्हणजे कोणत्याही नगरपालिकेच्या किंवा कोणत्याही नगरपालिकेच्या अध्यक्षाच्या शक्तींचा वापर करण्यासाठी व कर्तव्ये पार पाडण्यासाठी नगरपालिका अधिनियमाचे कलम ५५, ३१३ किंवा ३१५ अन्वये किंवा इतर कोणतेही उपबंध याद्वारे किंवा या अन्वये नेमलेली, कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारी कोणतीही व्यक्ती ;

(ब) "पालिका" किंवा "नगरपालिका" आणि "निवडणूक" यांना नगरपालिका अधिनियमामध्ये जे अर्थ नेमून दिले असतील तेच अर्थ असतील ;

१९६५ चा महा-राष्ट्र ४०. (क) "नगरपालिका अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ ;

(ड) या अधिनियमात कोणत्याही नगरपालिकेच्या संबंधात वापरण्यात आलेल्या परंतु या मध्ये व्याख्या करण्यात न आलेल्या शब्दांचे व शब्दप्रयोगांचे अर्थ हे, त्यांना नगरपालिका अधिनियमात नेमून दिलेल्या अर्थाप्रमाणेच असतील.

विवक्षित नगरपालिकांच्या निवडणुका पुढे ढकलणे व प्रशासकांचा पदावधी वाढवणे.

३. (१) नगरपालिका अधिनियम किंवा तदन्वये केलेले कोणतेही नियम, दिलेले आदेश, व केलेले उपविधी किंवा कोणत्याही न्यायालयाचा कोणताही निर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) हा अधिनियम अंमलात असण्याच्या मुदतीत आणि ३१ डिसेंबर १९७९ हा दिवस धरून त्या मुदतीपर्यंत किंवा राज्य सरकार कलम १, पोट-कलम (३) अन्वये जी तारीख अधिसूचित करील अशा त्यापूर्वीच्या मुदतीत, ज्या नगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका नोव्हेंबर-डिसेंबर, १९७४ मध्ये घेण्यात आल्या होत्या अशा कोणत्याही नगरपालिकांच्या सदस्यांची किंवा अध्यक्षाची कोणतीही सार्वत्रिक निवडणूक आणि अशा नगरपालिकांमधील कोणत्याही पालिका सदस्याचे किंवा अध्यक्षाचे कोणतेही तात्पुरते रिकामे झालेले पद भरण्यासाठी कोणतीही निवडणूक घेण्यात येणार नाही.

(ब) कोणत्याही अध्यक्षाच्या शक्तींचा वापर करण्यासाठी व त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस जे पदावर आहेत (मग त्यांची मुदत किंवा वाढीव मुदत उक्त तारखेपूर्वी संपलेली असो किंवा उक्त मुदतीमध्ये उक्त तारखेनंतर कोणत्याही वेळी संपणार असो) अशा कोणत्याही नगरपालिकांच्या कोणत्याही प्रशासकाचा किंवा प्रशासकांचा पदावधी वाढवण्यात आल्याचे किंवा यथास्थिति वाढवण्यात येणार असल्याचे मानण्यात येईल, व प्रत्येक प्रशासक किंवा प्रशासक म्हणून त्यांच्या जागी वेळोवेळी नियुक्त करण्यात आलेली इतर कोणतीही व्यक्ती, उक्त मुदतीत पद धारण करण्याचे चालू राहील.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाद्वारे वाढविण्यात आलेला प्रशासकांचा पदावधी संपल्यानंतर, ते, ज्यामध्ये गणपूर्ती झाली असेल अशा, स्थापित किंवा यथास्थिति पुनःस्थापित नगरपालिकेची पहिली सभा ज्या तारखेस घेण्यात येईल त्या तारखेच्या लगतपूर्वीच्या तारखेपर्यंत पद धारण करण्याचे चालू राहील.

विद्यमान प्रशासकांची वाढीव मुदत संपल्यानंतर नवीन नगरपालिका स्थापन करण्यासाठी करावयाची व्यवस्था.

४. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त मुदतीमध्ये वाढवून दिलेला विद्यमान प्रशासकाचा किंवा प्रशासकांचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी किंवा समाप्त झाल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, नगरपालिका अधिनियम आणि त्याखाली केलेले नियम व उप-विधी यांच्या उपबंधांनुसार नवीन नगरपालिका स्थापन किंवा पुन्हा स्थापन करण्यासाठी संचालक, जिल्हाधिकारी व अन्य संबंधित शासकीय नगरपालिका अधिकारी, राज्य शासन शासकीय राजपत्रामध्ये अधिसूचित करील अशा (उक्त मुदत समाप्त होण्यापूर्वीची तारीख असलेल्या) तारखेनंतर व्यवस्था करतील.

नगरपालिका अधिनियम लागू करणे. ५. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीजकरून नगरपालिका अधिनियम हा संबंधित नगरपालिकांस इतर सर्व बाबतीत लागू असेल.

अडचणी दूर करणे. ६. या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवेल तर, राज्य शासनास अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ त्यास, आदेशाद्वारे, प्रसंगपरत्वे आवश्यक असल्याचे दिसून येईल अशी कोणतीही गोष्ट करता येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ चे निरसन. ७. (१) महाराष्ट्र नगरपालिका (नगरपालिकांच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९७८ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९७८ चा महा. अध्या. ९.

(२) अध्यादेश अशाप्रकारे निरसित करण्यात आलेला असला तरीही उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कृती (काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशासह) ही या अधिनियमाच्या तदनुरूप उपबंधांनुसार केली असल्याचे किंवा यथास्थिति आदेश काढण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

य. शं. कानिटकर,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.